# प्राध्यापकांचे स्थुत्य यश: पी.एचडी पदवी प्राप्त विद्याशाखेवर निवड

महाविद्यालयाच्या विकास समितीत अभिनंदन

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथील ग्रंथपाल डॉ. एम.डी. वराडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर यांची पी.एचडी. पदवी प्रदान केल्या बद्दल तसेच महाविद्यालयातील मराठी विभागामार्फत डॉ. आर.एल. जवरास यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पी.एचडी पदवी प्राप्त केल्या बद्दल तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांची अकौंटसी अभ्यास मंडळामधुन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेवर, महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. किशोर पाठक यांची क्रीडा अभ्यास मंडळामधुन शिक्षणशास्त्र विद्याशाखेवर व डॉ. प्रभाकर महाले यांची व्यवसाय प्रशासन अभ्यास मंडळामधुन वाणिज्य विद्याशाखेवर निवड झाली.

वरील सर्व यशस्वी प्राध्यापकांचे महाविद्यालयाच्या विकास समितीत अभिनंदन करण्यात आले, व संस्थेचे अध्यक्ष मा. मिठुलालजी अग्रवाल, संस्थेचे संचालक अशोकभाऊ जैन, मा. श्रीरामभाऊ बडगुजर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.





